# प्रसिध्दी पत्रक

आरोपी लोकसेवक - श्री.काकाराव बाजीराव जिवरग, वय 52 वर्षे, पद- कनिष्ठ लिपीक, तालुका कृषी अधिकारी सिल्लोड कार्यालय सिल्लोड, (वर्ग-3) यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख 4500/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिल्लोड शहर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.काकाराव बाजीराव जिवरग, वय 52 वर्षे, पद- कनिष्ठ लिपीक, तालुका कृषी अधिकारी सिल्लोड कार्यालय सिल्लोड, (वर्ग-3) रा. माणिकनगर, कारखाना ता. सिल्लोड, सिल्लोड |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 4500/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती दिपाली निकम, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या वडीलांचे पेन्शन मंजुर करुन आणण्यासाठी सेवा पुस्तक ऑनलाईन करुन नागपूर येथे पाठविण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे वडील सेवानिवृत्त झाले असुन सेवानिवृत्ती नंतर त्यांचे पेन्शन मंजुर करुन आणण्यासाठी सेवा पुस्तक ऑनलाईन करुन नागपुर येथे पाठविण्यासाठी आ.लो.से. श्री. काकाराव जिवरग हे तक्रारदार यांच्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री काकाराव जिवरग यांनी तक्रारदार यांच्याकडे 5000/- रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती 4500/- रुपये लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि.02/03/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री काकाराव बाजीराव जिवरग, कनिष्ठ लिपीक यांनी लाचेची रक्कम 4500/-रुपये पंच साक्षीदारा समक्ष तालुका कृषी अधिकारी कार्यालय सिल्लोड येथील स्वत:च्या कार्यालयात स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से. श्री काकाराव जिवरग यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे सिल्लोड शहर औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिपाली निकम यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोहवा/रविंद्र काळे, पो.ना.सुनील पाटील, शिरिष वाघ, चालक पो.अ. चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई. मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064.

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189


2/3/23

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.